# पुणे महानगरपालिका - वृक्ष गणना

# काम सोपविलेली संस्था - लोटस एन्व्हायरमेंट्स, पटवर्धन बाग, पुणे ०४

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ कलम ४ मधील वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये कलम ७ ख मध्ये मनपा अधिकार क्षेत्रातील, सर्व जमिनीवरील विद्यमान वृक्षांची गणना करण्याची, तरतुद करण्यांत आली आहे. त्यानुसार पुणे शहरातील वृक्षांची गणना करण्यांत येत आहे.

नागरिकरण आणि औद्योगिकीकरण यांच्या वाढत्या गतीमुळे पुणे शहराच्या नागरी क्षेत्रातील वृक्षांच्या संख्येवर परिणाम होत असून, पर्यायाने पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. शहराच्या नागरी क्षेत्रातील झाडांचे जतन करण्यांसाठी अधिक चांगली तरतुद करणे आणि त्या क्षेत्रात समुचित प्रमाणात वृक्षांची आवश्यक संख्या आहे किंवा नाही याची खात्री करण्यांसाठी वृक्ष गणना करणे हा वरील कायद्यातील तरतुदीचा मुख्य उद्‌देश असून, तो अत्यंत महत्वाचा आहे. त्यानुसार, पुणे महानगरपालिकेने आपल्या अधिकार क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय, महानगरपालिकेचे व खाजगी मालकीच्या जागेतील वृक्षांची गणना करण्याचा निर्णय घेतला आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी तसेच महानगरपालिका यांच्या जागेतील वृक्षांची गणना करण्याचे काम टेंडर पध्दतीने मे. लोटस एन्व्हायरमेंट्स, पटवर्धन बाग, पुणे – ०४ यांचेकडून करण्यांत येत आहे. त्यासाठी मे. लोटस एनव्हायरमेंट्स यांनी वनस्पतीशास्त्र, वनशास्त्र, शेतीशास्त्र विषयांतील तज्ञांची व वृक्षगणकांची निवड केलेली आहे.

सदर वृक्षगणकांना वृक्षगणनेसंदर्भात प्रशिक्षण दिले. सुरवातीला प्रशिक्षण हेतुने अनुभवी वनस्पती तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्यांत आले. काही निमशासकीय व वनविभागाच्या मिळकतीचे सर्वेक्षण करण्यांत आले.

विद्यमान वृक्षांची गणना करतांना प्रत्येक झाडाचे शास्त्रीय, प्रचलित / स्थानिक नांव, मध्यवेढी, अंदाजे उंची, वय तसेच त्या झाडाची सद्यस्थिती सर्व्हेशिटवर नोंदविली जाते व त्या परिसराचे छायाचित्रण केले जाते. वृक्षांच्या माहितीसोबतच मिळकतीचे वर्णन म्हणजेच मिळकतीचे नांव, पत्ता, अंदाजे क्षेत्रफळ व माहिती देणा-याची स्वाक्षरी घेण्यांत येते.

आतापर्यंत औंध क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत संपुर्ण प्रभाग तसेच वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत संपुर्ण प्रभाग, कर्वेरोड, घोले रोड क्षेत्रीय कार्यालयामधील अंतर्गत संपुर्ण प्रभागांतील सर्वेक्षणाचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभागांतील वृक्षगणना अंतिम टप्प्यात आहे. सहकारनगर, हडपसर, धनकवडी व बिबवेवाडी या वार्डांत सर्वेक्षणाचे काम अंशतः पुर्ण झालेले आहे.

वनविभाग अंतर्गत मिळकतीमध्ये वेताळ टेकडी (भांबुर्डा), पांचगाव पर्वती, पर्वती (तळजाई) टेकडी, वारजे खिंड, चांदणी चौक (बावधन, कोथरूड, वारजे ) वनविभाग, कोंढवा, वानवडी, हडपसर वनक्षेत्र या वनविभागाची वृक्षगणना पूर्ण झाली आहे. आतापर्यत झालेल्या वनक्षेत्राची वृक्षसंख्या सात लाखाहुन अधिक तसेच सुमारे २३२ वृक्षांच्या प्रजातींची नोंद करण्यांत आली आहे.

त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठ, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (ARAI), कात्रज सर्पोद्यान, एम.आय.टी. (कोथरूड), आरम्मेंट रिसर्च डेव्हलपमेंट एक्स्प्लोजीव (ARDE), हाय एनर्जी मटेरिअल्स् रिसर्च लॅबोरेटरी (HEMRL), इस्टेट मॅनेजमेंट युनिट (EMU) पाषाण, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (NCL) या शासकीय / निमशासकीय मिळकतींचा वृक्षगणनेचा सर्व्हे पुर्ण झाला आहे. या संस्थांमध्ये सुमारे २१० वृक्षांच्या प्रजातींची नोंद करण्यांत आली आहे. आहे. तसेच वृक्षसंख्या सहा लाखाहुन अधिक आहे .

खाजगी मिळकतीमध्ये औंध क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सुतारवाडी प्रभाग, पाषाण, संजय गांधी हॉस्पीटल प्रभाग, बोपोडी, औंध गांव, बाणेर - बालेवाडी, औंध (आय.टी. आय), पुणे विद्यापीठ प्रभाग, राजभवन, इत्यादी प्रभागातील वृक्षगणना सर्वेक्षण झालेले आहे. वरील प्रभागातील वृक्षसंख्या **६,७२,०९१** आहे.

त्याचप्रमाणे, वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयामधील, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, मेजर ताथवडे उद्यान, कोथरूड गांव, हॅपी कॉलनी, डहाणूकर कॉलनी, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, वारजे जलशुध्दीकरण प्रकल्प, पॉप्युलर नगर वारजे, वारजे माळवाडी, महर्षी कर्वेनगर या प्रभागांची वृक्षगणना पूर्ण झाली आहे. वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभागातील वृक्षसंख्या **३,१६,७४६** आहे.

कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयामधील शंकरराव मोरे विद्यालय, रामबाग कॉलनी, किष्किंधा नगर, रामकृष्ण परमहंस नगर, वेदभवन, आयडीयल कॉलनी, यशवंतराव चव्हाण नाटयगृह , वनाझ कंपनी, महात्मा सोसायटी या प्रभागांची वृक्षगणना पूर्ण झाली असून वृक्षसंख्या **२,८२,६७१** आहे.

घोले रोड क्षेत्रीय कार्यालयामधील प्रभागांची वृक्षगणना पूर्ण झाली असून कमलनयन बजाज गार्डन, शेतकी कॉलेज, चतुश्रृंगी मंदिर, मॉडर्न कॉलेज, गोखले नगर, फर्ग्युसन कॉलेज, पुणे महानगरपालिका भवन इत्यादी प्रभागांतून वृक्षसंख्या **३,४४,७९४** आहे.

# कामाची सद्यस्थिती- क्षेत्रीय कार्यालय निहाय

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नांव | दि. ३१/३/२०१० पर्यत कामाची सद्यस्थिती | मोजणी केलेल्या वृक्षांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **औंध** | वृक्षगणना पुर्ण | ६,७२,०९१ | |
| २ | **वारजे कवेनगर** | वृक्षगणना पुर्ण | ३,१६,७४६ | |
| ३ | **कर्वे रोड** | वृक्षगणना पुर्ण | २,८२,६७१ | |
| ४ | **घोले रोड** | वृक्षगणना पुर्ण | ३,४४,७९४ | |
| ५ | **सहकारनगर** | काम प्रगतीपथावर | २,५७,९३६* | |
| ६ | **बिबवेवाडी** | काम प्रगतीपथावर | २१,८३३* | |
| ७ | **धनकवडी** | काम प्रगतीपथावर | २५,४४६* | |
| ८ | **हडपसर** | काम प्रगतीपथावर | ३०,०९२* | |
| ९ | **येरवडा** | काम प्रगतीपथावर | ३६१७* | |
| १० | **ढोले पाटील रोड** | काम प्रगतीपथावर | २६,३३४* | |
| ११ | **संगमवाडी** | अद्याप सुरू केले नाही | -- | |
| १२ | **भवानी पेठ** | अद्याप सुरू केले नाही | -- | |
| १३ | **टिळक रोड** | अद्याप सुरू केले नाही | -- | |
| १४ | **कसबा विश्रामबाग वाडा** | अद्याप सुरू केले नाही | -- | |
| | | **एकुण** | १९,८१,५६० | |

(*संगणक संकलण/वृक्षगणना प्रगतीपथावर असल्यामुळे आकडेवारीत बदल होऊ शकतो.)

संगणक संकलित केलेल्या आतापर्यतच्या माहितीनुसार सदर क्षेत्रातून **१९,८१,५६०** वृक्षांची नोंदणी करण्यांत आली आहे. तसेच सुमारे १२० चौ. कि.मी. हून अधिक क्षेत्रातील वृक्षगणना पूर्ण झाली आहे.

# कामाची सद्यस्थिती- प्रभाग निहाय

## औंध क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभाग | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| २४ | संजय गांधी रूग्णालय प्रभाग | ८४१६ |
| २५ | बोपोडी प्रभाग | १९८२ |
| २६ | पुणे विद्यापीठ प्रभाग | ७१३७३ |
| २७ | औंध गांव प्रभाग | ७८६९ |
| २८ | बाणेर - बालेवाडी प्रभाग | २८५५० |
| २९ | सुतारवाडी | ४६७६६२ |
| ३० | पाषाण | ४६८५९ |
| ३१ | औंध आय. टी. आय. प्रभाग | २२२८५ |
| ३२ | राजभवन प्रभाग | १७०९५ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **६,७२,०९१** |

# वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत संपुर्ण प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ६६ | दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल | १४६४६ |
| १०५ | मेजर ताथवडे उद्यान | १६५७८ |
| १०६ | कोथरूड गांव | ९६१२ |
| १०७ | हॅपी कॉलनी | ६०७२ |
| १०८ | डहाणूकर कॉलनी | ८६३९ |
| १०९ | वारजे जलशुध्दीकरण पकल्प | ४०९४५ |
| ११० | पॉप्युलर नगर वारजे | १९३५६२ |
| १११ | वारजे माळवाडी | ४६६८ |
| ११२ | महर्षी कर्वेनगर | १७४७८ |
| ११३ | हिगणे स्त्री शिक्षण संस्था | ४५४६ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **३,१६,७४६** |

# कर्वे रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ५७ | शंकरराव मोरे विद्यालय | १२६६२७ |
| ५८ | रामबाग कॉलनी | ६७५२ |
| ५९ | किष्किंधा नगर | १८०७ |
| ६० | रामकृष्ण परमहंस नगर | ६३५५ |
| ६१ | वेदभवन | १०२२५७ |
| ६२ | महात्मा सोसायटी, कोथरूड | १७३२३ |
| ६३ | वनाझ कंपनी | २००० |
| ६४ | यशवंतराव चव्हाण नाटयगृह | ६२६३ |
| ६५ | आयडियल कॉलनी | १३२८७ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **२,८२,६७१** |

# घोले रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| २२ | कमलनयन बजाज गार्डन | ८०४५ |
| २३ | शेतकी कॉलेज | २४६५६ |
| ३३ | चतुश्रृंगी मंदिर | १०५३६ |
| ३४ | मॉडेल कॉलनी | २१०६४ |
| ३५ | मॉर्डन कॉलेज | १४१९१ |
| ३६ | पुणे महानगरपालिका भवन | ४५५७ |
| ५३ | फर्ग्युसन कॉलेज | १७८६८ |
| ५४ | डॉ. होमीभाभा हॉस्पीटल | १४०५ |
| ५५ | गोखले नगर | १६८५१५ |
| ५६ | लॉ कॉलेज | ६०८८४ |
| ६७ | डेक्कन जिमखाना | १३०७३ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **३,४४,७९४** |

## बा. स. ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ३७ | डॉ. नायडू हॉस्पीटल | ३८७२ |
| ३८ | बंडगार्डन | ७३४० |
| ३९ | वाडिया कॉलेज | १०६०९ |
| ४० | कोरेगांव पार्क | ३२०१ (काम प्रगतीपथावर) |
| ४१ | मुंढवा गांव | -- |
| ४५ | विकासनगर – घोरपडी | -- |
| ४६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान | -- |
| ४७ | ससून हॉस्पीटल | ७७५ (काम प्रगतीपथावर) |
| ४९ | जुना बाजार | ५३७ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **२६,३३४** |

# सहकारनगर  क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ९८ | सॅलिसबरी पार्क | |
| ९९ | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ | |
| १०० | पर्वती दर्शन | |
| ११५ | शाहू कॉलेज | |
| ११६ | पर्वती इंडस्टीयल इस्टेट | |
| ११७ | महर्षीनगर | |
| ११८ | छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड | |
| ११९ | डीएडी कॉलनी | |
| १२४ | शंकर महाराज मठ | |
| १२५ | पद्मावती - अरणेश्वर | |
| १२६ | तळजाई मंदिर (वनक्षेत्र पाचगांव पर्वती, तळजाई टेकडी) | २,३३,७१६+२४,२२० |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **२,५७,९३६** |

# बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| **प्रभाग क्रमांक** | **प्रभागाचे नांव** | **एकूण वृक्ष** |
|---|---|---|
| ९७ | महादजी शिंदे छत्री | |
| १२० | कोंढवा खुर्द | |
| १२१ | एन. आय. बी. एम. | २१८३३ |
| १२२ | मिठानगर | |
| १२३ | बिबवेवाडी गांव | |
| १३७ | सुखसागर नगर | |
| १३८ | विश्वकर्मा इन्स्टिटयुट (बिबवेवाडी) | |
| १४० | कोंढवा बु. | |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **२१,८३३** |

# धनकवडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| १३२ | चव्हाण नगर | |
| १३३ | धनकवडी आंबेगांव पठार | |
| १३४ | धनकवडी गांव | |
| १३५ | चैतन्यनगर – धनकवडी | |
| १३६ | बालाजीनगर | |
| १४१ | कात्रज गांव | |
| १४२ | राजीव गांधी पाणी संगहालय | २५,४४६ |
| १४३ | भारती विद्यापीठ | |
| १४४ | आगर मंदिर कात्रज | |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **२५,४४६** |

# हडपसर  क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ४२ | मगरपट्टा - हडपसर | |
| ४३ | हडपसर औद्योगिक वसाहत | |
| ४४ | सेंट पेटीक टाऊन | |
| ८९ | वानवडी गांव (वनक्षेत्र वानवडी) | ९१३९ |
| ९० | रामटेकडी | |
| ९१ | हडपसर गांव (वनक्षेत्र - हडपसर) | १४,३८५ |
| ९२ | ग्लायडींग सेंटर | |
| ९३ | साधना विद्यालय | |
| ९४ | सातववाडी | |
| ९५ | काळे - बोराटे नगर | |
| ९६ | महंमदवाडी ( वनक्षेत्र-महंमदवाडी ) | ६५६८ |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **३०,०९२** |

# येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग

| प्रभाग कमांक | प्रभागाचे नांव | एकूण वृक्ष |
|---|---|---|
| ७ | लोहगांव विमानतळ | ८१७ |
| ८ | खराडी गांव | १४५० |
| ९ | खराडी इन्फोटेक पार्क | |
| १० | सुंदरबाई मराठे विद्यालय | |
| ११ | वडगांव शेरी | १३५० |
| १२ | रामवाडी | |
| १३ | आगाखान पॅलेस | |
| १४ | डॉन बॉस्को हायस्कूल | |
| १५ | नागपूर चाळ | |
| | **एकूण वृक्षांची संख्या** | **३६१७** |

# STATUS OF TREE CENSUS, PUNE MUNICIPAL CORPORATION
# (AUGUST - 2010)




## LEGEND

- SURVEY COMPLETED
- SURVEY PARTIALLY COMPLETED
- SURVEY YET TO BE STARTED

सर्वेक्षण केलेला भाग, भूगर्भशास्त्रीय दृष्टीने दख्खनच्या पठाराचा आहे. सर्वसाधारणपणे या भागांत हलकी ते मध्यम प्रकारची, राखाडी, मध्यम काळसर किंवा तपकीरी रंगाची जमीन (माती) आढळते.

खोलीनुसारही वेगवेगळया प्रकारचे मातीचे नमुने सापडतात. अनेक भागामध्ये ठिसुळ मुरूम सापडतो. तसेच अनेक ठिकाणी खडक आढळतात. जमिनीचा पृष्ठभाग निम्न कठीण आहे. जलनिःसारण ब-यापैकी आहे. जमिनीच्या पोतानुसार, वनस्पतीमध्ये वैविध्य आढळते.

वृक्ष गणना केलेल्या भागामध्ये वर्षभराच्या बहुतेक काळांत वातावरण कोरडे असते. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे वर्षाचे तीन ऋतु स्पष्टपणे जाणवतात. त्यानुसार पाने झडणा-या वनस्पती या भागात प्रामुख्याने आढळतात.

वृक्ष गणना केलेल्या भागामध्ये प्रामुख्याने पुढील प्रकारच्या वृक्षांची नोंद करण्यांत आली आहे.

| **प्रचलित / स्थानिक नांव** | **शास्त्रीय नांव** |
|---|---|
| वावली | *Holoptelia integrifolia* |
| चिंच | *Tamarindus indica* |
| देशी बदाम | *Terminalia Catappa* |
| गुळभेंड | *Thespesia populnea* |
| सोनमोहर | *Peltophorum pterocarpum* |
| पांढरा चाफा | *Plumeria alba* |
| अशोक | *Polyalthia longifolia* |
| करंज | *Pongamia pinnata* |
| बॉटल बश | *Callistemon citrinces* |
| भेरली माड | *Caryota urens* |
| काशिद | *Cassia siamea* |

| | |
|---|---|
| नारळ | *Cocos nucifera* |
| पर्जन्य | *Samanea saman* |
| पिचकारी | *Spathodea campanulata* |
| महोगणी | *Swietenia mahagoni* |
| बोर | *Ziziphus mauritiana* |
| लाल खैर | *Acacia chundra* |
| हिवर | *Acacia leucophloea* |
| महारूख | *Ailanthus excelsa* |
| शिरीष | *Albizia lebbeck* |
| फणस | *Artocarpus heterophyllus* |
| कडुलिंब | *Azadirachta indica* |
| आकाशनिम | *Millingtonia hortensis* |
| गिरीपुष्प | *Gliricidia sepium* |
| कांचन | *Bauhinia purpurea* |
| निलमोहर | *Jacaranda acutifolia* |
| शिसम | *Dalbergia sissoo* |
| गुलमोहर | *Delonix regia* |
| पिंप्री | *Ficus amplissima* |
| उंबर | *Ficus racemosa* |
| निलगिरी | *Eucalyptus maculata* |
| सुबाभुळ | *Leucaena latisiliqua* |

सर्वेक्षण केलेल्या भागामध्ये आवळा (*Emblica officinalis*), बेहडा (*Terminalia bellirica*), अर्जुन (*Terminalia cuneata*), करंज (*Pongamia pinnata*), जांभुळ

(*Syzygium cumini*), फणस (*Artocarpus heterophyllus*), बांबु (*Bambusa arundinacea*), नारळ (*Cocos nucifera*), शिंदी (*Phoenix sylvestris*), चिंच (*Tamarindus indica*), बोर (*Ziziphus mauritiana*) इत्यादी प्रकारच्या आर्थिकदृष्टया उपयुक्त वृक्षांची नोंद करण्यांत आली आहे.

वृक्षगणना करतांना वरील भागामध्ये कनकचंपा (*Ochna squarrosa*), सुरंगी (*Mammea suriga*), सिता अशोक (*Saraca asoca*), कांचनराज (*Bauhinia blackeana*), गुलाबी सावर (*Bombax ellipticum*), गोरख चिंच (*Adansonia digitata*), रूद्राक्ष (*Elaeocarpus ganitrus*), करमाल (*Dillenia indica*), ऑईल पाम् (*Elaeis guineensis*), बिबळा (*Pterocarpus marsupium*), कैलासपती (*Couroupita guianensis*), रक्तरोडा *(Diospyros nigrescens*) इत्यादी प्रकारच्या त्यामानाने दुर्मिळ वृक्षांचीही नोंद वृक्षगणना सर्वेक्षणांत करण्यांत आली आहे.

सामान्यपणे बहुतेक वृक्ष मध्यम आकाराचे असून त्यांचा सरासरी परीघ (GBH) ४०-९० सेंमी इतका आहे. बहुतेक वृक्षांची सरासरी उंची १५ ते ४० फूट आहे. झाडांचे सरासरी वय २० ते ५० वर्षाचे आहे. अनेक वृक्षांची पाने हिवाळयांत झडणारी आहेत. सर्वसाधारणपणे वर्षभरातील वातावरण कोरडे व पाने झडणारे असते.

गेल्या १८-२० वर्षात, सर्वेक्षण केलेल्या भागातील, खाजगी, निमशासकीय व शासकीय मालमत्ता, मानवाच्या वेगवेगळया कृतीमुळे तणावाखाली आहेत. प्रामुख्याने बांधकामात होत असलेली अमर्याद वाढ, रस्ते रूंदीकरण, सांडपाणी निचरा व्यवस्थेतील वाढ, वीज जोड, दळणवळण यंत्रणा आणि निरनिराळी विकास कामे, तणावासाठी कारणीभूत आहेत. परंतु वनक्षेत्र, शासकीय मिळकती, रस्त्यालगत व मोकळया जागेमध्ये, नव्याने झालेल्या खाजगी मिळकतीमध्ये, मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड झालेली आहे.

बहुतांश मिळकतीमध्ये सर्वेक्षणांस जाणेसाठी ताबडतोब/वेळेवर परवानगी न मिळाल्याने सदर जागामालकाची पूर्व नियोजीत वेळ घेवून सर्वेक्षण करण्यांत येते. वृक्षगणने साठी जागा मालकाची परवानगी घेताना त्या व्यक्तीच्या महापालिकेबरोबर असलेल्या अनेक अडचणी तसेच प्रश्नांना उत्तरे देणे, तसेच फळझाडे, फुलझाडे व औषधी वनस्पती इ. बाबत असलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे या मुळे मुख्यत्वेकरून खाजगी मिळकतीमध्ये वृक्षगणकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही खाजगी मिळकतीमध्ये वृक्षगणकांना विशेषतः दुपारच्या वेळेत सर्वेक्षण करण्यांस हरकती घेण्यांत येत आहेत. सर्वेक्षण करतेवेळी छायाचित्र घेण्यासही लोकांचा विरोध होत आहे. सर्वेक्षण नमुना भरून घेतेवेळी मिळकतदार (जागा मालक) स्वाक्षरी करणेस मनाई करीत आहे. नागरिकांमध्ये वृक्षगणनेबाबत जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. जनतेच्या निरूत्साहामुळे वृक्षगणनेचे काम वेळेत पूर्ण करणे जिकरीचे आहे. तमाम लोकांना या संबंधी वेळो वेळी जाहीर आवाहन करण्यांत येत आहे.

वृक्ष गणनेचे काम मे. लोटस एन्व्हायरमेट्स, यांना देण्यांत आलेले आहे. तरी, त्यांचे अधिकारी व सेवक वृक्षगणनेच्या कामासाठी आपले मिळकतीमध्ये सर्वेक्षण व आवश्यक छायाचित्रणासाठी येत आहेत. कृपया त्यांना वृक्षगणनेच्या कामात आवश्यक ते सहकार्य करावे हि विनंती. वृक्ष गणनेचे कामात आपल्या काही तक्रारी असल्यास उद्यान कार्यालयाचे खालील दूरध्वनी क्रमांकावर अथवा उद्यान कार्यालयाचे अधिकारी यांच्या नावापुढे दिलेल्या भमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

उद्यान कार्यालय, संभाजी उद्यान - २५५३२५१४, २५५३८५५३
उद्यान अधिक्षक (वृक्ष) श्री. घोरपडे अशोक दिगंबर - ९६८९९३१३४०
हॉटिकल्चर सुपरवायझर- श्री. बांबळे शशिकांत - ९९७०००४४१५
प्रकल्प अधिकारी, लोटस एन्व्हायरमेंट्स, - श्री. डॉ. जाधव संदीप - ९७६६६१२०७७

# <u>पुणे महानगरपालिका - वृक्ष गणना</u>



अनुभवी वनस्पती तज्ञांकडून मार्गदर्शन व प्रशिक्षण



वृक्षगणना माहिती संकलण



वृक्षगणना माहिती संकलण



















